# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ३०/५/२००९ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०२) इतिवृत्त

शनिवार, दिनांक ३० मे २००९ रोजी स्थायी समितीची सभा, माननीय सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.३५ वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला मा.आयुक्त श्री.वसंत व्ही. वैद्य, नगर सचिव श्री. एम. ए. पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
२. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
३. श्री.जावेद हसन खान
४. श्री.गवळी रविकांत काशिनाथ
५. श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
६. श्रीमती मोमीन सफिया फिरदौस
७. श्री.सुरे सिताराम इसराम
८. श्री.सोनवणे कचरू श्रीपत
९. श्री.कैसर खान बद्रोद्दिन खान
१०. श्रीमती खान मेहरून्निसा हमीद खान
११. श्री.प्रल्हाद गणपतराव निमगांवकर
१२. श्री.पांडे विनायक प्रभाकर

**<u>संवाद :</u>**

मा.सभापती : स्थायी समितीच्या सभागृहामध्ये मा.आयुक्त आलेले आहेत ते आपला परिचय सभागृहास करून देत आहे.

मा.आयुक्त : मी वसंत वैद्य औरंगाबाद महानगरपालिकेत दिनांक १६ एप्रिल २००९ रोजी आयुक्त म्हणून रूजू झालेलो आहे, मी अनेक शासकीय विभागात काम केलेले आहे यापुर्वी अप्पर जिल्हाधिकारी म्हणुन पुणे येथे कार्यरत होते.

श्री.रविकांत गवळी : स्थायी समितीच्या सभापती पदावर दुसऱ्यांदा निवड झाली त्याबद्दल आपले अभिनंदन करण्यात येते, तसेच कार्यक्षम असे नविन आयुक्त महानगरपालिकेला लाभलेले आहे त्यांचे स्थायी समितीच्या सर्व स.सदस्यांच्यावतीने अभिनंदन करण्यात येते.

श्री.सतिष कटकटे : लोकसभेची तिन महिन्यांची आचारसंहिता होती. या वेळेस औरंगाबाद लोकसभेचे खासदार म्हणून श्री.चंद्रकांत खैरे यांनी तिसऱ्यांदा निवडून येऊन विजयाची हॅट्रिक केली त्याबाबत त्यांचे तसेच आपलेही अभिनंदन या सभागृहातर्फे करण्यात यावे.

श्री.नारायण कुचे : जालना लोकसभेचे खासदार श्री.रावसाहेब दानवे यांनी सुध्दा हॅट्रिक केली त्यांचेसुध्दा अभिनंदन करण्यात यावे.

मा.सभापती : औरंगाबाद आणि जालना लोकसभा मतदारासंघाचे नवनिर्वाचित खासदार मा.श्री.चंद्रकांतजी खैरे आणि मा.श्री.रावसाहेब दानवे यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येते.

**<u>विषय क्र. ०२ :</u>**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.आयुक्त यांच्या मंजुरीनुसार सिडको हडको भागातील प्रभाग **ब** व **इ** या प्रभागात विभागाचे १० भाग करून निविदेद्वारे कंत्राटी पध्दतीने साफसफाईचे कंत्राट सहा ठेकेदारांना देण्यात आले होते. दि.७/१०/२००८ रोजी संबंधीत १० कंत्राटदारांनी साफसफाईचे काम बंद करण्याबाबत लेखी अर्ज देऊन संबंधीतांनी साफसफाईचे काम बंद केले आहे.

मा.आयुक्त यांच्या दि.१४/१०/२००८ च्या मंजुरीनुसार सदरील प्रभाग **ब** व **इ** करीता दारिद्र्य रेषेखालील बचत गटास साफसफाईचे काम देण्यात यावे असे सुचित केले असुन त्या अनुषंगाने सिडको-हडको भागातील एकुण वॉर्ड ब व इ प्रभागाचे एकुण २८ भाग करून २८ बचतगटांना साफसफाईचे काम देण्यात आले असून अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

**नियम व अटी :**

१. उपरोक्त कामासाठी बचतगटास मेहनतांना दरमहा ४% देय असेल म्हणजेच १५ कामगारांच्या वेतनाचया ४% रक्कम रू.२३६५/- देय राहिल.
२. प्रती कामगार प्रति दिन रू.१४६/- देय असेल. बचत गटामार्फत निव्वळ वेतन प्रति दिन रू.११९/- प्रती कामगार देण्यात येईल.
३. नमुद रकमेत कामगारांचे दरमहा भरावयाच्या पीएफ १३.६१% आणि ईएसआय ४.७५% या रक्कमेचा समावेश आहे.
४. पीएफ व ईएसआय ची रक्कम संबंधीत कामगाराच्या नांवे खात्यावर नियमितपणे जमा करणे बचत गटावर बंधनकारक राहील.
५. बचत गटाने उपस्थित कामगारांची दररोज सकाळी ५.३० वा. हजेरी घ्यावी. त्यावेळी मनपाचा जवान किंवा स्वच्छता निरीक्षक उपस्थित असावा.
६. बचत गटाने प्रमाणित केलेल्या हजेरी नुसार कामगारांना मंजुरी देण्यात यावी.
७. मनपातर्फे बचत गटास त्यांचा मेहनतांना कामगारांचे वेतन यांचा एक व पी.एफ.+ ईएसआय च्या रकमेचा एक वेगळा धनादेश देण्यात यावा. किमान वेतन कायद्यानुसार वेतन देण्याची, पीएफ व इएसआय रक्कम कामगारांच्या नांवे जमा करण्याची जबाबदारी संबंधीत गचतगटांची राहील.

खालील यादीतील २८ बचतगटांना दि.०१ जानेवारी २००९ ते ३१ जानेवारी २००९ पर्यंत एक महिन्याचा आदेश देण्यात आला होता.

**घनकचरा व्यवस्थापन महिला बचत गटाची यादी**

| अ.क्र. | महिला बचत गटाचे नांव | महिला बचत गटाचे कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| १. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर रमाबाई महिला बचतगट, जाधववाडी, औरंगाबाद | गणेशनगर, एन-८ अंतर्गत येणाऱ्या सोसायट्या |
| २. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर लक्की महिला बचतगट, एकतानगर, जटवाडा रोड, पंचशील चौक, औ'बाद | अयोध्यानगर, त्रिवेणीनगर, आनंदवन सोसा., एन-७ कार्यालयाच्या मागील भाग, देवगिरी बँक पर्यंत |
| ३. | सुजाता महिला बचत गट, गल्ली नं.११ अंबिकानगर मुकुंदवाडी, औ'बाद | शिवनेरी कॉलनी, म्हाडा कॉलनी, अयोध्यानगर |
| ४. | साई महिला बचत गट, नारळीबाग, औरंगाबाद | पवननगर, रंजनवन सोसायटी, ज्ञानेश्वरनगर, शिवाजीनगर |
| ५. | धम्मज्योत महिला बचत गट, गल्ली नं.१० अंबिकानगर, मुकुंदवाडी, औरंगाबाद | श्रीकृष्णनगर, पोलीस कॉलनी, दिपनगर |
| ६. | एकता महिला बचत गट, एकतानगर, पंचशील चौक, जटवाडा रोड, सेंट्रल जेलच्या मागे, औरंगाबाद | सुदर्शननगर, रविनगर, गजानननगर, द्वारकानगर |
| ७. | संस्कार महिला बचत गट, एकतानगर, पंचशील चौक, जटवाडा रोड, सेंट्रल जेलच्या मागे, औरंगाबाद | यादवनगर, नवजीवन कॉलनी, नवनाथनगर |

| | | |
|---|---|---|
| ८. | जय दुर्गामाता महिला बचत गट, जुनी मुकुंदवाडी, महादेव मंदीराजवळ, औरंगाबाद | स्वामी विवेकानंदनगर, एन-१२ अंतर्गत येणारे सेक्टर |
| ९. | पंचशील महिला बचत गट, प्रियदश्रनी इंदिरानगर, औरंगाबाद. | छत्रपतीनगर, भारतमाता नगर, दिल्लीगेट, एन-१२ योजना एसबीएच कॉलनी |
| १०. | आदर्श स्वयंसहाय्यता महिला बचत गट, आंबेडकरनगर, एन-७ सिडको, औरंगाबाद | संभाजी कॉलनी, मथुरानगर, शिवज्योती कॉलनी एन-६ |
| ११. | रेणुका महिला बचत गट, नारळीबाग, औरंगाबाद | अविष्कार कॉलनी, चिस्तीया कॉलनी, शुभश्री कॉलनी, साईनगर सिंहगड कॉलनी |
| १२. | पंचशील महिला बचत गट, घाटी जयभीमनगर | गुलमोहर कॉलनी, अरूणोदय कॉलनी, सह्याद्रीनगर, वीर सावरकरनगर, सत्यमनगर, टेलिकॉम सोसा. |
| १३. | तक्षशीला महिला स्वयंसहाय्यता बचत गट, आंबेडकरनगर, औरंगाबाद | टाऊन सेंटर, एमजीएम परिसर, कॅनॉट प्लेस, सेंटर सर्व्हीस इंडस्ट्रीज |
| १४. | श्रध्दा महिला बचत गट, भिमनगर, भावसिंगपुरा | सिडको एन-१ अंतर्गत येणारे सेक्टर, एपीआय गरवारे रोड |
| १५. | संसकार महिला बचत गट, गारखेडा गट नं.३ हुसेन कॉ. न्यायनगर, गारखेडा परिसर | व्हीआयपी रस्ते, सेव्हन हिल ते मुकुंदवाडी विमानतळ संपूर्ण ग्रीन बेल्ट |
| १६. | वैशाली महिला बचत गट, शताब्दीनगर, मजनुहिल हडको एन-१२ औरंगाबाद | व्हीआयपी रस्ते रेणुका माता मंदिर ते हर्सुल टी पॉईन्ट |
| १७. | कल्पतरू महिला बचत गट, एकतानगर, पंचशील चौक | व्हीआयपी रस्ते सिडको बस स्टँड ते आंबेडकर चौक रेणुका माता मंदिर |
| १८. | सिध्दार्थ महिला बचत गट, घ.नं.२० नामांतर कॉलनी, सिध्दार्थनगर, औ. | एन-२ ठाकरेनगर, एसटी कॉलनी, महाजन कॉलनी, एन-२ संपुर्ण वॉर्ड |
| १९. | भिमाई महिला व बाल विकास समिती, जयभीमनगर | ज्ञानेश्वर कॉलनी, जे सेक्टर संघर्षनगर, वडारवाडी संपुर्ण वॉर्ड |
| २०. | परिवर्तन महिला बचत गट, गल्ली नं.२१ इंदिरानगर, बायजीपुरा | रामनगर पुर्ण परिसर, बेघर योजना संपुर्ण वॉर्ड |
| २१. | भिमाई महिला व बाल विकास समिती-२, जयभीमनगर, औरंगाबाद | विठ्ठलनगर नविन विकलेला भूखंड, १३ वी योजना, सदाशिवनगर |
| २२. | धम्मशील महिला बचत गट, जयभीमनगर, घाटी, औरंगाबाद | शिवाजीनगर पुर्ण |
| २३. | मयुरी महिला बचत गट, भिमनगर, भावसिंगपुरा,औरंगाबाद | सव्हे नं.५९, ६०. |
| २४. | उपासना महिला बचत गटा, सिध्दार्थनगर, नामांतर कॉ. हडको, औरंगाबाद | ११ वी व १२ वी योजना |
| २५. | गुरू रविदास चर्मकार महिला बचत गट, आंबेडकरनगर, गल्ली नं.१२ एन-७ सिडको | एन-३, एन-४ |
| २६. | बोधीसत्व महिला बचत गट, नामांतर कॉलनी, सिध्दार्थनगर, एन-१२ हडको | हॉटेल दिपाली ते शिवाजी महाराज पुतळा रस्ता दोन्ही बाजु |
| २७. | आम्रपाली महिला बचत गट, आनंदनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद | एनएस-४ सर्व्हे क्र.२३, २४ व १३ वी योजना |
| २८. | ज्ञानगंगा महिला बचतगट, शताब्दीनगर, औरंगाबाद | टाऊन सेंटर ते सिडको बस स्टँड रोड, कॅनॉट प्लेस, सेंटर सर्व्हीस |

महानगरपालिकेने पुर्वी वॉर्ड ब व इ अंतर्गत साफसफाई बाबत दिलेल्या सिडकोतील भाग क्र.१ ते १० कंत्राटदारांचे मासिक देयक देण्यासाठी रू.२०,७१,१२३/- इतका खर्च येत होता. आता वॉर्ड ब व इ अंतर्गत २८ बचत गटांना साफसफाईचे काम दिलेले असुन एका बचत गटाकडे सरासरी १५ सफाई कामगार असल्यास एका महिन्यास अंदाजित रू.१६,५५,६४०/- खर्च येईल. या रकमेत कचऱ्याची वाहतूक, घंटा गाड्या, खराचे इत्यादी खर्चाचा समावेश नाही.

**१. १ जानेवारी २००९ रोजीच्या स्थायी समिती सभेत मा.सभापती यांनी वरीलप्रमाणे बचत गटांना एक महिन्या ऐवजी एक वर्षाचे काम देण्यात यावे असु सुचित केलेले आहे. प्रभाग ब व इ मध्ये अनेक वर्षापासुन कंत्राटदारांचे सुमारे ३५० कामगार सध्याही कार्यरत आहेत. बचतगटाकडे काम दिल्यामुळे सदर कामगार या पध्दतीस विरोध करीत आहेत. त्यामुळे खालील प्रमुख बाबींवर निर्णय होणेस विनंती आहे.**

**२. बचत गटांना स्वतःचे कामगार कामावर लावण्याचे स्वातंत्र्य असावे किंवा कसे?**

**३. सध्या कार्यरत कामगारांवर बचत गटांचे नियंत्रण असु नये अशी कामगार शक्ती संघटनेची मागणी आहे. याबाबत निर्णय व्हावा.**

वरील नियम व अटींसह काम वरील २८ बचत गटांना देण्यास व ३१ मार्च २०१० पर्यंत मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : विषय क्र.२ बाबत निर्णय घेण्यापुर्वी काही खुलासा अपेक्षीत आहे. वॉर्ड ब व इ संदर्भात साफसफाई बाबत बऱ्याच दिवसांपासून चर्चा चालू आहे. स्थायी समितीने बचत गटास साफसफाई बाबत आदेशीत केलेले होते. या संदर्भात प्रशासनाकडुन प्रस्ताव आलेला आहे त्यानुसार नियम व अटीसंदर्भात खुलासा हवा आहे.

अति.शहर अभियंता : विषय क्रमांक २ वॉर्ड ब व इ अंतर्गत साफसफाईच्या बाबतीत असून यापूर्वी या प्रभागामध्ये खाजगी कंत्राटदारातर्फे काम करत होते. त्यांचे काम असमाधानकारक असल्यामुळे हे काम बचत गटामार्फत लेबर लावून साफसफाईचे काम करणेचे प्रस्तावीत असून स्थायी समितीसमोर मंजूरीसाठी ठेवलेला आहे.

श्री.रविकांत गवळी : नियम व अटीमध्ये प्रति कामगार प्रतिदिन १४६ देय असेल बचतगटातर्फे निव्वळ वेतन प्रति दिन ११९/- प्रति कामगार येईल. शासनाचे परिपत्रक दिनांक ७ मे २००९ श्री.अरविंद कुमार यांनी महानगरपालिकेस एक पत्र दिलेले आहे त्यानुसार किमान वेतन १५१ असायला हवे. १३.६१ टक्के पीएफ भरायला पाहिजे. ६१% महानगरपालिकेने व १२.३९ टक्के त्यांचे पगारातून वसुल करायला पाहिजे. अद्यापपर्यंत पीएफ कपात करून पीएफ ऑफिसला भरणा केलेली नाही तर याचा भरणा का केला नाही याचाही खुलासा हवा आहे.

कार्यकारी अभियंता : पीएफचा धनादेश संबधीत ऑफिसला सादर केला होता, परंतु बचतगटाचे अकाँउट ओपन नसल्यामुळे भरला गेला नाही. बचत गटाने आता अकाँउट ओपन केलेले आहे धनादेश ऑफिसमध्ये देण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी : याचअनुषंगाने इएसआय ४.७५ कपात केला पाहिजे तो कपात होतो का?

कार्यकारी अभियंता : दोन्ही धनादेश वेगवेगळे काढण्यात येतात.

श्री.रविकांत गवळी : जी.आर.च्या शेवटच्या परिच्छेदमध्ये लिहिले आहे की, ड्रेनेज लाईनचे, कचरा वाहतुकीचे काम धोकादायक स्वरूपाचे असल्याने कंत्राटी कामगाराच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना व विमा संरक्षण उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यासंदर्भात विमा काढलेला आहे काय?

अति. शहर अभियंता : अजून काढण्यात आला नाही सदरील प्रस्ताव झाल्यानंतर विमा काढण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी : १ जानेवारीच्या स्थायी समितीमध्ये सभापतीने वरील प्रमाणे बचत गटास १ महिण्याऐवजी १ वर्षाचा कालावधी देण्यात यावे असे सुचित करण्यात आले होते परंतु त्यामध्ये दोन विषय असे आलेले आहे की, बचतगटास स्वतःचे कामगार लावण्यास स्वतंत्र्य असावे किंवा काय? हा निर्णय स्थायी समितीमध्ये घ्यायचा आहे. बऱ्याच

वर्षापासून अस्थायी स्वरूपाचे कर्मचारी महानगरपालिकेत काम करत आहे. साफसफाई बाबत कर्मचाऱ्यांवर अंकुश आपलेच असायला हवे. नविन कर्मचारी घेण्यापैक्षा पुर्वीपासुन जे कर्मचारी काम करतात त्यांना प्राध्यान्य दिले पाहिजे.

श्री.नारायण कुचे : काही कर्मचारी संघटना बचत गटांवर दबाव आणतात. बचत गटास कर्मचारी काम करीत नसेल तर काढण्याचा तसेच नविन कर्मचारी घेण्याचा अधिकार बचत गटास देण्यात यावा. जेणे करून कामगांरावर आपला अंकुश राहिल.

मा.सभापती : तसे अधिकार बचत गटास देता येते का?

कार्यकारी अभियंता : जर कोणी कर्मचारी काम करीत नसेल तर त्यांना काढून टाकण्याचे अधिकार बचत गटास आहे.

श्री.सतिष कटकटे : दैनिक सकाळच्या बातमीनुसार रॅम्केचे काम शहरात सुरू होणार आहे मग बचतगट कुठले काम करणार आहे.या बाबत माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : स्थायी समितीची कुठलीही परवानगी न घेता पुर्व सुचना न देता स्थायी समितीला विश्वासात न घेता पेपरबाजी करणे आपल्या अधिकाऱ्यांमार्फत चालू आहे. मा.माजी आयुक्त श्री.गुप्ता साहेब होते तेव्हा एक परिपत्रक काढण्यात आले आहे . धोरणात्मक निर्णय किंवा न्युज पेपरला माहिती दयायची असेल तर मा.आयुक्त, मा.महापौर, सभापती करतील.

कार्यकारी अभियंता : कुठल्याही वृत्तपत्रास कुठल्याही प्रकारची बातमी देण्यात आलेली नाही.

श्री.सतिष कटकटे : रॅम्को संदर्भात शहरात काम चालू करणार आहे किंवा नाही किंवा बचत गटांनाच सन २००९-१० पर्यंत देणार आहे.

अति.शहर अभियंता : बचतगटाचे काम वेगळया स्वरूपाचे आहे. सदरील काम झाडू मारण्याचे आहे.

श्री.सतिष कटकटे : वृत्तपत्रात बातमी आलेली आहे खुलासा करण्यात यावा की रॅम्कोला काम देणार आहे किंवा नाही.

अति. शहरअभियंता : कुठल्याही वृत्तपत्राला काहीही बातमी दिलेली नाही.

श्री.रविकांत गवळी : तिन वेळेस रॅम्केबाबत सभागृहात चर्चा झालेली आहे. दोन वेळेस सर्वानुमते मंजूरी रद्द केलेली आहे. त्यांची अंमलबजावनी अद्यापपर्यंत प्रशासनाकडुन झालेली आहे काय?

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे रॅम्केने काम सुरू करायचे किंवा नाही यावर प्रशासनाचा निर्णय झालेला नाही.

श्री.रविकांत गवळी : एखादया एजन्सीला काम दयायचे किंवा नाही याचा अधिकार स्थायी समितीचा आहे किंवा नाही. स्थायी समितीने निर्णय दिल्यानंतर प्रशासनाने त्यांची अंमलबजावणी केली नाही.

मा.सभापती : १ जून पासून रॅम्केचे काम सुरू होणार आहे का?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : रॅम्केशी महानगरपालिकेने करार केलेला आहे काय? त्यांना काम करण्याची परवानगी दिलेली आहे काय? कुठलेही अधिकारी याबाबत माहिती देवू शकत नाही द्विधा मनस्थितीत शासन आणि पदाधिकारी आहेत मा.सभापतींना अशी विनंती आहे की, रॅम्कोशी करार करण्याचा अधिकार अधिकाऱ्यांना किंवा सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभा यांना आहे या संदर्भात खुलासा करून रॅम्कोला काम देवू नये असे स्पष्टपणे सांगीतले आहे. समजा रॅम्कोला काम दयायचे असेल तर परत ठराव आणण्यात यावा व मंजूरी घेण्यात यावी. लोकांमध्ये वेगळा गैरसमज झालेला आहे स्थायी समिती वेगळा निर्णय घेते सर्वसाधारण सभा वेगळा निर्णय घेते आणि अधिकाऱ्यांचे वेगळेच व्यक्त्यव्य येते यावर शासनाचे दबाव आहे . शासनाचा याबाबत कुठलेही दबान नाही असे माझे व्ययक्तिक मत आहे. रॅम्कोबाबत प्रशासनातर्फे स्पष्ट खुलासा करण्यात यावा.

श्री.सतिष कटकटे : रॅम्केला काम सुरू केल्यावर शासन आर्थीक मदत देणार असे वृत्तपत्रात आले आहे. यासंदर्भात शासनाकडुन कुठले पत्र आले आहे काय?

मा.सभापती : श्री.एम.डी.सोनवणे, कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केलेला आहे कि वृत्तपत्रास कुठलिही माहिती देण्यात आलेली नाही.

श्री.नारायण कुचे : सन २०१० पर्यंत बचत गटास साफसफाईचे कामास मंजूरी देण्यात यावी.

श्री.विनायक पांडे : श्री.एम.डी.सोनवणे यांनी रॅम्के संदर्भात खुलासा केलेला आहे तरी रॅम्केच्या संदर्भातील खुलासा स्वतः मा.आयुक्तांनी करावा.

मा.आयुक्त : रॅम्केच्या विषयी जी चर्चा चालू आहे सभापती व सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, रॅम्केला काम देण्यासाठी निवीदा मागविण्यात आल्या. त्यांच्या काही निवीदा अटी व शर्तीवर मान्य करण्यात आल्या याला सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. त्याचा जो करारनामा झालेला आहे तो लिखीत स्वरूपात झालेला आहे आणि ॲग्रीमेंटमधील काही क्लॉज अत्यंत महत्वाचे आहे त्याच्यात जर काही डिस्पुट झाला तर आरबीट्रेटरला तो रेफर करायचा आणि तो दोन्ही गटांना मान्य नसेल तर कोर्टात जायचे आहे. वन वे टर्मीनेट करता येणार नाही. याच्यानंतर सर्वसाधारण सभेचे ठराव झाल्यानंतर जे काही स्थायी समितीने ठराव घेतले जो आत्ता उल्लेख केलेला आहे सर्वसाधारण सभेचा ठराव रद्द स्थायी समितीच्या याने होतो काय? याबाबतीत सचिव त्यांनी अभिप्राय देण्याची सुचना राहिल. त्याची लिगल पोझीशन काय राहिल आणि लिगल पोझीशन बघीतल्या शिवाय सर्वसाधारण सभेने ठराव केलेला आहे आणि करार लेखी स्वरूपात केलेला आहे ते एकतर्फी रद्द होईल काय? ॲग्रीमेंट रद्द झाले तर त्याची आर्थीक जबाबदारी निष्पन्न झाली तर ती आर्थीक जबाबदारी कोणावरी टाकावी लागेल हे महत्वाचे मुद्दे आहेत. ॲग्रीमेंटचा जो क्लॉज आहे त्याच्यामध्ये आरबिट्रेटर हा शब्द निश्चितपणे वापरलेला आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : ॲग्रीमेंट ज्या पध्दतीने लिगली झाले पाहिजे होते त्या पध्दतीने झालेले नाही. ज्या लोकांच्या सहया घेतल्या त्यांचा काही संबध नाही. स्थायी समितीच्या कुठल्याही सदस्यांच्या त्यावर सहया नाहीत. मागील बैठकीत सांगण्यात आले होते की, स्थायी समितीच्या सदस्यांच्या सहया झाल्याशिवाय ॲग्रीमेंट होत नाही हा त्यातील वाद आहे.

मा.आयुक्त : कायदेशीर मुद्दा तपासला पाहिजे.

श्री.रविकांत गवळी : सर्वसाधारण सभेने एखादा ठराव घेतला त्याच्या नियम व अटी ठरविल्या गेल्यातर तो बदलण्याचा अधिकारसुध्दा मा.आयुक्तांना किवा इतर व्यक्तींना आहे काय?

अति.शहर अभियंता : रॅम्कोसोबत ज्यावेळेस करारनामा झाला त्यावेळी महापौर,उपमहापौर आयुक्त, पदाधिकारी एकत्र बसून तो करारनामा केला गेला. महापौर आणि इतर पदाधिकाऱ्यांच्या करारावर सहया झाल्या आणि नंतर स्थायी समितीच्या सदस्यांच्या घेण्याचे ठरविण्यात आले होते. करारावर स्थायी समितीच्या कुठल्याही सदस्यांच्या सहया झालेल्या नाहीत परंतु आयुक्त, इतर मा.पदाधिकारी, अधिकारी यांच्या सहया झालेल्या आहेत.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : पदाधिकाऱ्यांना करार करण्याचा अधिकार आहे काय?

अति.शहर अभियंता : करारनामा संबधीत अधिकारी आणि एजन्सीत केला जातो आणि witness म्हणून स्थायी समितीच्या सदस्यांच्या सहया असतात. या प्रकरणात स.पदाधिकाऱ्यांच्या सहया झ ालेल्या आहेत परंतु स्थायी समितीच्या सदस्यांच्या किंवा सभापतींची सही झालेली नाही.

मा.सभापती : कोणत्या पदाधिकाऱ्यांच्या सहया झालेल्या आहेत.

अति.शहर अभियंता : मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.विरोधी पक्षनेता, मा.आयुक्त आणि संबधीत अधिकारी आणि एजन्सी यांच्या सहया झालेल्या आहेत.

श्री.रविकांत गवळी : करारनामा झाल्यानंतर बदल करण्याचा अधिकार कुणाला आहे समजा ७ वर्षाचा गुत्ता सबंधीत एजन्सीला दिला तो १० वर्ष करण्याचा अधिकार कुणाला आहे. सुरवातील रॅम्केला महानगरपालिकेचे कर्मचारी द्यायचे नाही असे ठरले होते त्यानंतर पुन्हा महानगरपालिकचे कर्मचारी देत आहे.

मा.सभापती : करारनामा ७ वर्षाहून १० वर्षाचा केला यास सर्वसाधारण सभेची मान्यता आहे काय?

अति.शहर अभियंता :सर्वसाधरण सभेची मान्यता झालेली आहे तसा ठराव झालेला आहे.

श्री.रविकांत गवळी : महानगरपालिका सुरवातीला कर्मचारी पूरविणार नव्हते

अति.शहर अभियंता : महानगरपालिकेचा आर्थिक फायदा महानगरपालिकेचा होईल त्यामुळे हि अट जास्तीची बांधलेली आहे.

मा.सभापती : आपले कर्मचारी त्यांना देतो हे पॉलिसी मॅटर आहे काय?

अति.शहर अभियंता : सदरील कर्मचारी आपण डेपोटेशनवर देत आहोत.

श्री.रविकांत गवळी : सदरील विषय सर्वसाधारण सभेपुढे येणे गरजेचा होता किंवा नाही.

अति.शहर अभियंता : सत्यता तपासावी लागेल.

मा.आयुक्त : जे कर्मचारी रॅम्केला देत आहे ते सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे काय?

अति.शहर अभियंता : सदरील विषय सर्वसाधारण सभेपुढे गेलेला नाही.

खान मेहरून्निसा : सर्वांची दिशाभुल करीत आहात. अधिकाऱ्यांना अधिकार आहेत काय?

मा.आयुक्त : जे कर्मचारी दयायचे आहेत त्यांचा पगार रॅम्के करणार आहेत त्यांचे सेवा वर्ग करण्यासाठी धोरणात्मक निर्णय म्हणून सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे किंवा नाही.

अति.शहर अभियंता : तो विषय सर्वसाधारण सभेपुढे गेलेलाच नाही.

मा.सभापती : जो पर्यंत सर्व गोष्टींवर चर्चा होत नाही तो पर्यंत रॅम्केचे काम कुठल्याही स्थितीत सुरू करू नये. स्थायी समितीचा असा आदेश आहे. विषय क्रमांक २ बचत गटाचा प्रस्ताव दुरूस्तीसह मंजूर करण्यात येतो. त्यांना आठवडयाची सुट्टी पगारासहीत, १५१/- रूपये प्रति दिवस आणि त्यांचा विमाही काढण्यात यावा. त्यांचे पिएफ आणि ईएसआयचे पैसे देण्यात यावे. दुरूस्तीसह प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. कामगार कायद्यानुसार देय असलेल्या सर्व सुविधा देण्यात याव्यात.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको हडको भागातील प्रभाग **ब** व **इ** या प्रभागात दारिद्र्य रेषेखालील बचत गटास साफसफाईचे काम देण्यास व त्या अनुषंगाने सिडको-हडको भागातील एकुण वॉर्ड ब व इ प्रभागाचे एकुण २८ भाग करून २८ बचतगटांना साफसफाईचे काम देण्यात यावे. प्रस्तावात दर्शविलेल्या अटी व शर्ती नुसार बचत गटामार्फत ३१ मार्च २०१० पर्यंत काम करून घेण्यास सर्वानुमते दुरूस्तीसह मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार त्यांना आठवडयाची पगारी सुट्टी, १५१/- रूपये प्रति दिवस आणि कामगारांचा विमा काढण्यात यावा. कामगारांचे पीएफ आणि ईएसआयचे पैसे देण्यात यावे. कामगार कायद्यानुसार देय असलेल्या सर्व सुविधा देण्यात याव्यात. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ०३ :</u>**

औरंगाबाद शहर/महानगरपालिका हद्दीतून वाहणाऱ्या नैसर्गिक पाणी प्रवाह विशेषत: शहराच्या नागरी वसाहतीतून/दाट वस्तीतून वाहणाऱ्या नाल्याची पावसाळापूर्व व पावसाळया दरम्यान नियमित सफाई करणे व नाला प्रवाह सुरळीत व्हावा जेणे करून नाला प्रवाह तुंबल्याने ऐन पावसाळ्यात लगतच्या घरांना/रहिवाशांना त्रास होवू नये म्हणून नियमित सफाई करण्याचे महानगरपालिकेने प्रस्तावित केले आहे. पावसाळापूर्व कामे मनपा यंत्रणे मार्फत सुरू करण्यात आलेली आहेत. सदर कामी महानगरपालिकेची उपलब्ध यंत्रणा/मशीनरी वापरण्यात येणार आहे, मात्र काही प्रमाणात खाजगी मशीनरी व ठेकेदाराचे माध्यमातून हे काम करावे लागणार असल्याने कामाचे एकंदरीत स्वरूप, किमान स्वरूपात करणे असलेले काम इत्यादीचा विचार करता रक्कम रू.३०.०० लक्ष सन २००९-२०१० चे अर्थसंकल्पात तरतूद करण्याचे अधिन राहून या कामासाठी निधी उपलबध करून देण्यासह या प्रमाणे काम करण्यास मान्यता व्हावी. सदर रक्कम वेगवेगळ्या नाल्यासाठी आवश्यकतेप्रमाणे विभागून वापरण्याची व अल्पमुदतीची निविदेस मान्यता व्हावी.

करीता प्रस्ताव सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर तातडीने कामे हाती घेऊन पावसाळापुर्व व पावसाळया दरम्यानचे नाला सफाईची कामे हाती घेण्यात येतील.

**<u>संवाद :</u>**

श्री.रविकांत गवळी : विषय क्रमांक ३ हा मान्सुनपुर्व काम आहे. मान्सुनपुर्व कार्यक्रमामध्ये जे आपल्याकडे मान्यता घेत आहे ति वस्तुस्थिती पुर्ण झालेली आहे काय? नाल्याचे काम कोणत्या गुत्तेदाराकडुन करण्यात आले किंवा महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडुन करून घेण्यात आले ते व्यवस्थित पुर्ण झाले आहे काय?

मा.सभापती : चालू आहे.

श्री.विनायक पांडे : हर्सल तलावापासून खाम नदी येते या खाम नदीमध्ये कुठे कुठे अडथळे आहेत अनाधिकृत प्लॉटिंग जिथे जिथे झालेली आहे ज्या वेळेस पूर आलेला आहे त्यावेळेस नागरी वसाहतींमध्ये या अनाधिकृत प्लॉटिंग/अडथळयांमुळे घरांमध्ये पाणी घुसलेले आहे. साफसफाईची पुर्ण कामे झालेली आहेत का? याचा खुलासा घेण्यात यावा.

मा.सभापती : खाम नदीवरील काम सुरू केले आहे का की करणार आहे.

शहर अभियंता : सुरू करणार आहे.

मा.सभापती : विषय क्रमांक ३ मंजूर करण्यात येतो. स.स.श्री.पांडे सुचविल्याप्रमाणे खाम नदीच्या पुरामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या तरी खाम नदीचे साफसफाईचे काम त्वरीत सुरू करण्यात यावे. नाले साफसफाई बाबत मा.आयुक्त सर्वांना माहिती देत आहे.

मा.आयुक्त : मुंबई येथे डिजास्टर मॅनेजमेंट बाबत महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील जिल्हाधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्तांची बैठक झाली. प्रत्येक जिल्हयाचा शासन स्तरावर रिव्हयु घेतला होता. यामध्ये जी माहिती दिली होती त्यात खाम नदी, ०९ मोठे नाले ५४ लहान नाले आणि १८१ वॉर्डामधील कामे करायची आहेत. त्यातील साधारणतः७० टक्के कामे झाले आहे. खाम नदीची लांबी औरंगाबाद शहरातून ६ कि.मि.पर्यंत जाते. यामध्ये सुरवातीस असा निर्णय झालेला होता की ज्या ठिकाणी गाळ किंवा कचरा साठल्याने वॉटर लॉकिंग होउन किनाऱ्यावर पाणी जाईल तो भाग आधी स्वच्छ करून घ्यावा आणि नंतर साधारणतःदोन तिन पावसानंतर हर्सुल डॅम ओव्हर फ्लो झाला तर त्याच्यातील पाणी सांडव्यावरून खाम नदीत येते. तांत्रिकदृष्टया तो तिसऱ्या टप्प्यात करण्यात यावा असे ठरविण्यात आलेले आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर/महानगरपालिका हद्दीतून वाहणाऱ्या नैसर्गिक पाणी प्रवाह विशेषतः शहराच्या नागरी वसाहतीतून/दाट वस्तीतून वाहणाऱ्या नाल्याची पावसाळापूर्व व पावसाळ्या दरम्यान नियमित सफाई करणे व नाला प्रवाह सुरळीत व्हावा यासाठी नियमित नाला सफाई करण्याचे कामासाठी रक्कम रू.३०.०० लक्ष सन २००९-२०१० चे अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी. सदर कामासाठी निधी उपलबध करून देण्यासह तातडीने कामे हाती घेऊन पावसाळापुर्व व पावसाळ्या दरम्यान नाला सफाईची कामे हाती घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पशुसंवर्धन विभागा अंतर्गत मांस (बीफ, मटन, मासोळी, चिकन) विक्री करणाऱ्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८१ व ३८२ अन्वये महानगरपालिका मार्केटमध्ये, खाजगी दुकानात मांस विक्री करण्याबाबत परवाना देण्यात येतो व प्रत्येक वर्षी परवान्याचे नुतनीकरण करण्यात येते. औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत मांस विक्री करणारे परवाना धारकांची एकुण संख्या ४४० (चारशे चाळीस) आहे. सन २००८-०९ या आर्थिक वर्षात परवाना नुतनीकरण फी रूपये ५७,३४०/- रक्कम मनपा फंडात जमा झाली आहे.

नवीन परवाना फी व नुतनीकरण फी ची वाढ सन १९९४ मध्ये करण्यात आली होती. त्यानंतर आजपर्यंत परवाना फी मध्ये वाढ करण्यात आलेली नाही. सन १९९४ मध्ये मांस विक्रीचे दर व आजच्या मांस विक्रीच्या दरात अंदाजे ५ ते ७ पटीने दर वाढलेला आहे. त्यामुळे परवाना फी व नुतनीकरण फी यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. तरी खालील दर्शविण्यात आल्याप्रमाणे नवीन परवाना फी व नुतनीकरण फी चा प्रस्ताव सादर करण्यात येतो.

| अ.क्र. | फी बाबत तपशील | सद्यःस्थितीत आकारण्यात | प्रस्तावित |
|---|---|---|---|

| | | येत असलेली फी रूपये | फी रूपये |
|---|---|---|---|
| १. | नवीन मांस विक्री परवाना | ५००/- | १२५०/- |
| २. | मांस विक्री परवाना नुतनीकरण फी | १००/- | २५०/- |
| ३. | स्थळ पाहणी अहवाल फी | २५/- | ५०/- |
| ४. | उशीरा परवाना फी प्रतिमाह (दंड) | ०५/- | २५/- |

सदर दरवाढ प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दिनांक १३/५/२००९ अन्वये मान्यता दिलेली आहे. करीता दर वाढविणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

मा.सभापती : विषय क्रमांक ४ मंजूर करण्यात येतो.

श्री.सिताराम सुरे : महानगरपालिकेच्या माध्यमातून मांस विक्री परवाना देत असतो तो एक वर्षाचा असतो यापुर्वी १९९४ ला दिलेला आहे आपल्या अधिकाऱ्यांना एक सूचना देण्यात यावी की उघडयावर मटन विक्री होणार नाही. उघडयावर मटन विक्रीमुळे नागरीकांच्या तक्रारीचा पाठपुरावा केला असता मला २० दिवस जेल झालेली आहे. अधिकाऱ्यांनी प्रश्न व्यवस्थितरीत्या हाताळला असतातर हि स्थिती आली नसती. अधिकाऱ्यांच्या संगणमतामुळे मी त्या आरोपामध्ये गोवल्या गेलो. ज्या ठिकाणी लिगली दुकाना असतील तिथेच परवाना देण्यात यावा.

मा.सभापती : रेट वाढविण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.

श्री.सिताराम सुरे : सद्यःस्थितीत असलेल्या रेटपेक्षा दुप्पट रेट वाढविण्यात यावा. उघडयावर ज्या दुकाना आहे त्या ठिकाणी परवाना देण्यात येवू नये.

मा.सभापती : प्रशासनातर्फे खुलासा करण्यात यावा.

पशुसंवर्धन अधिकारी : उघडयावर मटन विक्री करण्याचा कुणालाही परवानगी दिलेली नाही.

श्री.सतिष कटकटे : स्थायी समितीने आदेश दिले होते की, उघडयावर जे मटन विक्री करतात त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

पशुसंवर्धन अधिकारी : संबधीतांवर कारवाई केलेली आहे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

श्री.सतिष कटकटे : उघडयावर जे मटन विक्री करतात. नियमाने जिथे मांस,मटन कापले जाते तिथे ते आपल्या सेंटरवर जावून शिक्का मारून कापता काय याबाबत तपासणी केलेली आहे काय? सुरवातीस सेंटरवर जावून शिक्का मारून नंतर कापण्यात यावे.

पशुसंवर्धन अधिकारी : याबाबत कार्यवाही चालू आहे. त्यासंदर्भात सविस्तर अहवाल देतो. १ जानेवारी २००९ ते २९ मे २००९ या काळात अनाधिकृत मांस विक्री व अवैध कत्तल विरूध्द आळा घालणे. पथकामार्फत कारवाई करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा १९७६ कलम ६, ७, ९ व मुंबई पोलिस कायदा १९५६ कलम १०५ ११७ अन्वये विविध पोलिस ठाण्यात २० लोकांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहे. मांस जप्तीची कारवाई २२ दुकानात १९५ किलो बीफ, १६६ किलो मटन, ३२ किलो चिकन व ९ किलो मासे जप्त करण्यात आले आहे.

श्री.विनायक पांडे : यापुर्वी अशी कारवाई झालेली आहे काय? किती महिण्यात हि कारवाई केलेली आहे.

पशुसंवर्धन अधिकारी : १ जानेवारी २००९ ते २९ मे २००९ पर्यंत

श्री.सिताराम सुरे : खाजगी सुरक्षेवर आपण लाखो रूपये खर्च करीत आहोत. टि.व्ही.सेंटर जळगाव रोड येथे १५ ते २० सुरक्षारक्षकांवर विनाकारण खर्च करीत आहे. अवैध मटन विक्रीत्यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी. अधिकारी सहकार्य करीत नसेल तर मंत्रालयात उपोषणास बसावे लागेल.

पशुसंवर्धन अधिकारी : सदरील कारवाया पोलिस संरक्षणामध्ये कराव्या लागतील. १ ड्रायव्हर १ सेनेटरी इन्स्पेक्टर २ मजूर मटन उचलण्याकरीता असतात आणि खाटक्याजवळ कत्त्या आणि हत्यारे असतात अशा परिस्थितीत कारवाई करता येईल अशी अपेक्षा करणे संयुक्तीक वाटत नाही. पोलिस आयुक्तांना आजपर्यंत सात ते आठ वेळेस पत्र देण्यात आले आहे.

श्री.विनायक पांडे : पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी जे मत मांडले ती वस्तुस्थिती आहे आपल्याजवळ पुरेशी सुरक्षा व्यवस्था उपलब्ध नसते खाटकाजवळ हत्यारे असतात. याकरीता पुरेशी पोलिस व्यवस्थेची मागणी करायला पाहिजे नंतरच हि कारवाई करायला पाहिजे.

श्री.रविकांत गवळी : गेल्या सतरा वर्षापासून दरवाढ केली गेली नाही सात ते आठ टक्के दरवाढ करणे अपेक्षीत आहे. जे दर आलेले आहेत ते मान्य करण्यास हरकत नाही. मांस विक्री करणारे परवाना धरकांची एकुण संख्या ४४० आहे. हि संख्या फार कमी आहे. काही अटींना दुरूस्ती करून परवाना देण्यात यावा.

मा.सभापती : सदरील विषय हा गंभीर स्वरूपाचा आहे. मा.आयुक्तांनी पुढे कशा स्वरूपाची कारवाई करण्यात येईल याबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त : स्थायी समितीसमोर हा जो प्रश्न उपस्थित झालेला आहे की संबधीत अधिकाऱ्यांनी काय कारवाई केली आणि जी कारवाई करण्यात आलेली आहे ती अत्यल्प प्रमाणात झालेली आहे असे सर्वानुमते मत झालेले आहे. संबधीत अधिकाऱ्यांना असे आदेश देतो आठवडयात कुठलाही दिवस न ठरवता त्यांनी अचानकपणे तपासणी करावी व काय कारवाई केली याचा अहवाल त्यांनी मा.सभापतींना प्रत्येक आठवडयात देण्यात यावा. या करीता त्यांना काही कर्मचाऱ्यांची गरज लागत असेलतर तेही देण्यात येईल.

श्री.सतिष कटकटे : सेंटरवर शिक्के मारतांना किती फीस आकारली जाते.

पशुसंवर्धन अधिकारी : ५ रूपये फि आकरली जाते.

श्री.सतिष कटकटे : मा.आयुक्तांनी याबाबत पहाणी करावी की एकाही बोकडयावर शिक्का मारलेला नसतो. लिगल दुकानांमधून जप्ती केली आहे का, अनधिकृत दुकानांमध्ये जप्ती केली आहे. शहरात २५०० ते ३००० मटन विक्रेते असतील.

पशुसंवर्धन अधिकारी : परवाना नाही पण मटन विक्री करतात अश्या ८८ जणांवर कारवाई केलेली आहे. सर्वच जण शिक्के मारून घेउन जात नाही.

श्रीमती मेहरून्निसा खान : शिक्के न मारता अवैधरित्या मटन विक्री केली जाते. महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी मटन विक्रेत्याकडुन वसूली करतात.

पशुसंवर्धन अधिकारी : कर्मचाऱ्यांनी वसूली केली तर हप्ता वसूली केली असे म्हटले जाते कारवाई केली नाहीतर जनतेच्या तक्रारी वाढतात.

मा.आयुक्त : कार्यवाही करण्यात येईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : खाटीकाला बकरा कापयचा असेल आणि आपली व्यवस्था पाच कि.मी.अंतरावर असेलतर त्याला तो खर्च लागतो तर व्यवस्था सेंटरलाईज करण्यात यावे.

श्री.सिताराम सुरे : गोवा येथे एकच सेंटर अस्तित्वात आहे तपासणी आणि कापणी एकाच ठिकाणी आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पशुसंवर्धन विभागा अंतर्गत मांस (बीफ, मटन, मासोळी, चिकन) विक्री करणाऱ्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८१ व ३८२ अन्वये महानगरपालिका मार्केटमध्ये, खाजगी दुकानात मांस विक्रीसाठी नवीन परवाना फी व नुतनीकरण फी यामध्ये प्रस्तावित केल्यानुसार वाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | तपशील | विद्यमान फी रूपये | स्थायी समितीने मंजुर केलेली फी रूपये |
|---|---|---|---|
| १. | नवीन मांस विक्री परवाना | ५००/- | १२५०/- |
| २. | मांस विक्री परवाना नुतनीकरण फी | १००/- | २५०/- |
| ३. | स्थळ पाहणी अहवाल फी | २५/- | ५०/- |
| ४. | उशीरा परवाना फी प्रतिमाह (दंड) | ०५/- | २५/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०५ :**

कार्यकारी अभियंता वॉर्ड - ब व क प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्राच्या संरक्षित भिंतीची उंची वाढवणे व संलग्न कामे करणे या कामाकरीता सा.बां. विभागाच्या सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.१२,९६,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास मा.स्थायी समिती सभेने विषय क्र.३७३ दि.२८/२/२००८ अन्वये मंजुरी प्रदान केली आहे. ई-निविदा विभागातर्फे निविदा कार्यवाही केली असता दर भरलेल्या तीन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. व्ही. एस. देशमुख | ८.९% जास्त दराने |
| २. | श्री. व्ही. आर. महाजन | २९% जास्त दराने |
| ३. | श्री. एस. एल. झोरे | ३८.२५% जास्त दराने |

प्राप्त कमी दराची निविदा तुलनात्मक तक्त्यासह प्रशासकीय मंजुरीस्तव सादर करण्यात आली होती. जास्त दराची निविदा प्राप्त झालेली असल्याने दरपृथःकरणासह प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले होते. गुत्तेदारास दरपृथःकरणाबाबत विचारणा केली असता निविदा दाखल करून १२० दिवसा पेक्षा जास्त कालावधी झ ाल्याने व खुल्या बाजारात साहित्याचे भाव वाढल्याने गुत्तेदाराने लेखी पत्र देऊन काम करण्यास नकार दिला. त्यामुळे मा.आयुक्त यांनी फेरनिविदा काढण्याचे आदेशीत केले.

ई-निविदा विभागामार्फत निविदा सुचना क्र.१०३/०८ दिनांक ८/१०/०८ अन्वये फेरनिविदा काढण्यात आली. तथापी दर भरलेली एकही व्यापारी निविदा प्राप्त झाली नाही. त्यानंतर निविदा सुचना क्र.११८/०८ दिनांक ३/११/०८ अन्वये तिसऱ्या वेळेस निविदा कार्यवाही केली. तथापी दर भरलेली एकही व्यापारी निविदा प्राप्त झाली नाही. चौथ्या वेळेस निविदा सुचना क्र.१३०/०८ दिनांक २७/११/०८ अन्वये निविदा कार्यवाही केली असता दर भरलेल्या दोन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | आर. के. कन्स्ट्रक्शन | ४१.९९% जास्त दराने |
| २. | उदय इंजिनिअरींग वर्क्स | ५९% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या आर.के. कन्स्ट्रक्शन यांची निविदा कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४१.९९% जास्त दराची आहे. गुत्तेदाराने दाखल केलेल्या दरानुसार कामाची किंमत रू.१८,४१,२६४/- इतकी येते. सा.बां. विभागाच्या सन २००८-०९ च्या दरसुचीशी तुलना केली असता अंदाजपत्रकीय रक्कम रू.१६,४४,१५४/- इतकी येते. ही रक्कम सन २००६-०७ च्या अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २६.७८% इतकी जास्त आहे. म्हणजेच गुत्तेदाराने दाखल केलेली निविदा ही २००८-०९ च्या दरसुचीनुसार ११.९९% जास्त दराची आहे. उपरोक्त दराची निविदा मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव सादर करण्याची मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

करीता फारोळा जलशुध्दीकरण केंद्राच्या संरक्षित भिंतीची उंची वाढवणे या कामासाठी आर.के. कन्स्ट्रक्शन यांची ४१.९९% जास्त दराची निविदा रक्कम रू.१८,४१,२६४/- च्या खर्चासह प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा. सभापती : विषय क्र.५ मंजुर करण्यात येतो.

श्री.रविकांत गवळी : विषय क्रमांक ५ मंजूर करण्यास हरकत नाही. सदरील प्रस्तावास उशीर झालेला आहे ९ टक्के वाढीव दराने दयावयास पाहिजे होते ते आज ४१ टक्के जास्त दराने दयावे लागते. यापुढे महानगरपालिकेचे नुकसान होणार नाही याची जाणीव ठेवण्यात यावी.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

कार्य.अभि.(श्री पानझडे) : सदरचे काम आहे त्यात चार वेळेस टेंडर निघाले कुणाचाही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे ते वाढत वाढत त्याचा काळ गेला.

श्री.रविकांत गवळी : सुरवातीला जे दर आले होते व्हि.एन.देशमुख ८.९ जास्त दराने सांगीतले आपण दरपुर्ती करण्याकरीता १२० दिवस लावले. सदरच्या गुत्तेदाराने नकार दिला त्यामुळे तिन वेळेस निवीदा काढल्या.

कार्य.अभि.(श्री पानझडे) : पुर्वीचे फारोळा स्टेशन होते ते रिमोट येरियामध्ये होते त्याच्या आजुबाजूला वस्ती नव्हती आता दोन्ही तिन्ही बाजूंनी तिथे वस्ती झालेली आहे जुनी चैनलिंक तोडुन लोक मध्ये जावून प्रातःविधी आटोपतात म्हणून त्याठिकाणी कायमस्वरूपी बांधकाम करीत आहे.

मा.सभापती : विषय क्रमांक ५ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्राच्या संरक्षित भिंतीची उंची वाढवणे व संलग्न कामे करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अं.प.दरापेक्षा ४१.९९% जास्त दराची आर.के. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस निविदा रक्कम रू.१८,४१,२६४/- च्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०६ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ.सलीम अली सरोवर सौंदर्यीकरण व विकसीत करणे बाबतच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन २००७-२००८ च्या दरसूची नुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये ५,५१,९२,५२०/- चे तयार करण्यात आले आहे. या कामाचा खर्च सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात सलीम अली सरोवर विकास योजना या लेखाशिर्षा मधुन करण्यात येत असुन या कामासाठी रक्कम रूपये ५,७०,००,०००/- एवढी तरतुद उपलब्ध आहे. तसेच उक्त कामासाठी महाराष्ट्र शासनाकडून २.५० कोटी एवढा निधी मंजुर झालेला असून त्यापैकी रक्कम रूपये १.०० कोटी महानगरपालिकेस प्राप्त झालेली आहे.

सदर काम पावसाळा सुरू होण्यापुर्वी करण्याच्या दृष्टीने २१ दिवसाची अल्प मुदतीची निविदा काढण्यात आली होती. दिनांक २०.०३.२००९ रोजी निविदा उघडण्याची तारीख निश्चित करण्यात आलेली होती. परंतु दिनांक ०२.०३.२००९ पासुन लोकसभा निवडणुक-२००९ संदर्भाने आदर्श आचार संहिता लागु झाली असल्याने उक्त कामाच्या निविदा उघडण्यात आल्या नाहीत.

लोसभा निवडणुक-२००९ संदर्भाने आदर्श आचार संहितेची अंमलबजावणी असल्याने व हे काम युध्द पातळीवर सुरू करण्याच्या दृष्टीने मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, औरंगाबाद यांचेकडून निविदा उघडण्याची परवानगी घेण्यात आलेली आहे. तद्नंतर निविदा उघडण्यात आल्या असता, उक्त कामासाठी एकूण चार निविदा विक्री झाल्या असून त्यापैकी खालील तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | सिव्हील कामासाठी प्राप्त निविदा दर | पार्ट बी.ओ.टी. कामासाठी प्राप्त रक्कम |
|---|---|---|---|
| १. | ग्रीनलॅंड, विरकॉन, अे/२, अर्थ रेसीडेन्स, बॅनर रोड, पुणे | ७.८६% जास्त दर | ५६,८०,०००/- |
| २. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी, घ.क्र.१-२७-४५, मंजुरपुरा, औरंगाबाद | १२.००% जास्त दर | ४०,००,०००/- |
| ३. | गंगामाई इंडस्ट्रीज ॲन्ड कन्स्ट्रक्शन लिमिटेड, दुसरा मजला, तापडीया टेरेस, अदालत रोड, औरंगाबाद | १५.००% जास्त दर | ५०,००,०००/- |

वरील प्रमाण्णे प्राप्त निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची ७.८६% जास्त दराची निविदा ग्रीनलॅंड, पुणे यांची प्राप्त आहे. तसेच बी.ओ.टी. कामासाठी सर्वात जास्त म्हणजे रक्कम रूपये ५६,८०,०००/- एवढी ऑफर दिलेली आहे.

पक्षी मित्र श्री.दिलीप यार्दी यांनी सूचविल्याप्रमाणे अंदाजपत्रकातील काही बाबी कमी केल्याने निविदेतील रक्कम रूपये १.७९ कोटी एवढ्या रकमेची बचत करण्यात येत आहे. अंदाजपत्रकातील उर्वरित रक्कम रूपये ३.७२ कोटीचे काम आवश्यकतेनुसार संबंधित निविदाधारक यांचेकडून करून घेण्यात येईल. आणि दुसऱ्या टप्प्यात हॉर्टीकल्चर, गार्डनींग, डिसील्टींग, फवारे व विद्युतीकरणाची कामे करून घेण्यात येतील.

तसेच दक्षिण बाजु कडील पाथवे, पार्कीगचे काम स्थगित ठेवल्याने सद्यःस्थितीत बी.ओ.टी. तत्वावरील दुकाने व फुडमॉल चे काम रद्द करण्यात येत आहे. तसेच निविदेतील परिसूची-ब च्या बाबी कमी किंवा जास्त झाल्यास निविदा धारक त्या बाबत आक्षेप घेणार नाही. तसे हमीपत्र निविदाधारक यांचेकडून करारनामा करते वेळी घेण्यात येईल.

संबंधित ठेकेदार यांना मा.आयुक्त यांचे दालनात वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले असता, निविदाधारक यांनी ७.८६% जास्त दराऐवजी ७.५०% जास्त दराने काम करण्यास तयार असल्या बाबतचे लेखी पत्र दिले

असता, तद्नंतर वाटाघाटी अंती संबंधित ठेकेदार यांनी उक्त निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५०% जास्त दरा ऐवजी ७.३८% जास्त दराने काम करण्यास पुन्हा लेखी संमती दिलेली आहे. व मा.आयुक्त महोदय यांनी उक्त कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.३८% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव मा.स्थायी समिती सभेकडे सादर करणे करीता शिफारस केलेली आहे.

करीता सदरील कामासाठी ग्रीनलँड, विरकॉन, पुणे यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.३८% जास्त दराच्या निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.सिताराम सुरे : जो गाळ काढत आहे महानगरपालिकेतर्फे हा गाळ खाजगी शेतकऱ्यांना दिला तर चालेल का.

मा.सभापती : तलावातील गाळ सर्वांसाठी मोफत खुला केलेला आहे कुणीही गाळ घेवून जावे. प्रशासनाने विषय क्रमांक ६ बाबत सविस्तर खुलासा करावा.

उपअभियंता (बीओटी) : सलिम अली सरोवर येथील निवीदा आपण ५ कोटी ५१ लाखाची काढण्यात आलेली आहे. त्यामध्ये महाराष्ट्र शासनाकडुन निधी मिळणार आहे. या कामामध्ये सलिम अली सरोवरचा सर्व गाळ काढायचा आहे तिन फुटाचा गाळ काढला आहे. त्याची खोली वाढविणार आहे. गाळ काढुन तिथे टाकणार आहे व दुसऱ्या टप्प्यात पुर्व बाजुस गार्डन विकसीत करणार आहे. पक्षीमित्र यांनी काही मुद्दे सुचविलेले आहे त्यांचे म्हणने आहे की, पाण्यामध्ये पाथवे तयार करत आहे त्याच्यामध्ये दुकाणे आणि फुडप्लाजा तयार करणार आहे ते आजीबात करू नये ते पक्षांकरीता बरोबर राहणार नाही म्हणून त्यामध्ये १कोटी ७१ लाखाचे काम रद्द करण्यात येत आहे. याच्यामध्ये ३ कोटी ७२ लाख आणि याच्यामध्ये ७.३८ टक्के जे above आलेले आहे ते पुर्ण ४ कोटीचे काम करायचे आहे याच्यामध्ये सलिम अली सरोवरचे गाळ काढणे सेंट्रलपाथवेचे सुशोभिकरण करणे व आजुबाजूच्या परिसराचे सुशोभिकरण करण्याचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच जे टॉवर आहे त्याचे सुशोभिकरण करायचे आहे. पार्कींग आणि प्रवेशद्वाराचे काम समाविष्ट आहे.

श्री.खान जावेद हसन खान : गेटची जागा बदलणार आहे काय?

मा.सभापती : तत्कालिन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्या हस्ते भूमिपुजन झाले होते तेव्हा गेटची जागा निश्चित झाली होती त्यावेळी आमदार राजेद्र दर्डा तसेच सर्व पदाधिकारी उपस्थित होते. त्याठिकाणची गेटची जागा बदलण्यात येणार आहे काय? अंदाजपत्रकाप्रमाणे गेट तिथेच राहणार आहे का.

उपअभियंता (बीओटी) : अंदाजपत्रकाप्रमाणे गेट तिथेच राहणार आहे.

श्री.सतिष कटकटे : गाळ महानगरपालिका काढणार आहे की संबधीत कंत्राटदार गाळ काढणार आहे.

मा.सभापती : मंजूरी दिल्याबरोबर गाळ गाढणार आहे.

उपअभियंता : गाळ काढण्यास कमीत कमी दहा दिवस मिळणार आहे. दहा दिवसात जेवढा गाळ काढता येणार आहे तेवढा गाळ काढणार त्याला Divertion करून ठेवणार त्याच्यामध्ये झऱ्या काढुन Dewatering करणार.

मा.सभापती : विषय क्रमांक ६ प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.सलिम अलि सरोवर विकसीत करण्याच्या कार्यक्रमाबाबत प्राप्त झालेले निविदेपैकी हा ठराव आलेला आहे. महाराष्ट्र राज्यचे तत्कालिन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी सदर कामाचे भुमिपूजन केले होते आणि संबधीत गुत्तेदाराकडुन काम सुरू झाल्यावर ते गेट तेथेच रहावे हि दक्षता घेवून ठराव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.सलीम अली सरोवर सौंदर्यीकरण व विकसीत करणे बाबतच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ग्रीनलँड, विरकॉन, ए/२, अर्थ रेसीडेन्स, बॅनर रोड, पुणे यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय

दरापेक्षा ७.३८% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री मा.ना.श्री.विलासरावजी देशमुख यांचे हस्ते उद्‌घाटन झाले होते त्या ठिकाणी डॉ.सलीम अली सरोवर येथे भव्य प्रवेशद्वार उभारण्यात यावे व बी.ओ.टी. तत्वावरील दुकाने व फुडमॉल चे काम रद्द करण्यात यावे. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ०७ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, पैठणगेट ते सिल्लेखाना ३०.०० मीटर रूंद विकास योजना रस्ता महानगरपालिकेतर्फे विकसित करण्यात येत असून नगर भूमापन क्रमांक १४१३९/पैकी ही मिळकत सौ.शोभा भ्र. विजयसिंह राजपुत यांची असून विकास योजना रस्त्यात ६२.२५ चौ.मी. क्षेत्र बाधीत होत आहे. संबंधितानी बाधीत भागाचा ताबा महानगरपालिकेशी वाटाघाटी आधारे हस्तांतर केलेला आहे.

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी सदर रस्त्यात बाधीत मिळकती ताब्यात घेणे बद्दल निर्णय दिलेला असून मोबदला स्वरूपात एफ.एस.आय., टी.डी.आर. अथवा धनादेशाद्वारे देण्यात येईल व खुल्या जागेचा दर रक्कम रूपये १८,०००/- प्रति चौ.मी. प्रमाणे देणेबद्दल आदेश प्राप्त आहेत. या मिळकतीसाठी सिध्द शिघ्र गणकाचे दर १५१००/- प्रति चौ.मी. आहेत.

नगर भूमापन क्रमांक १४१३९/पैकी क्षेत्र ६२.२५ चौ.मी. बाधीत होत असून दर रूपये १८,०००/- प्रति चौ.मी. प्रमाणे रक्कम रूपये ११,२०,५००/- होत आहे. याशिवाय प्रचलित पध्दती प्रमाणे खरेदी खतासाठी होणारा खर्च भूखंडधारक व महानगरपालिका हे ५०%-५०% एवढा करतात. त्यासाठी जो खर्च येईल त्यासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.सतिष कटकटे : सिल्लेखाना येथील कब्रस्थान संपादित केले आहे का महानगरपालिकेने केले आहे की खाजगी लोकांनी केले आहे खुलासा करण्यात यावा. WBM कुठपर्यंत करण्यात आले व ते का थांबण्यात आले.

मा.आयुक्त : दोन पध्दतीने संपादन करता येते एकतर दोघांच्या संम्मतीने संपादन करता येते व दुसरी म्हणजे भुसंपादन कार्यालयामार्फत संपादन करता येते.

श्री.सतिष कटकटे : भुसंपादन करणार आहे म्हणुन पत्र देण्यात आले आहे काय?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : सदरचा विषय यापुर्वी का आला नाही .

श्री.सतिष कटकटे : ज्या व्यक्तिला आपण पैसे देणार आहे त्यांच्या घरापर्यंत महानगरपालिकेने WBM केले आहे काय?

शहर अभियंता : आपल्यापुढे जो विषय आहे त्यात एक प्रॉपर्टी राजपूतची आहे पैठणगेटच्या समोरच्या पुर्वेकडच्या प्रॉपर्टीज आपण डिमोलिश केल्या आणि रस्ता रूंदिकरण करण्याचे ठरविले आपण पत्र देवुन कळविले की, FSI घेणार की TDR का रोख रकमेच्या स्वरूपात पाहिजे.

श्री.सतिष कटकटे : रस्ता रूंदिकरण करतांना आपण जागा संपादित केली त्याबाबतचे पत्र दिले आहे काय?

शहर अभियंता : पत्र दिले आहे, महानगरपालिकेनेच कब्रस्थान संपादन केले आहे. खाजगी तडजोडीने झ ाली आहे. कब्रस्थान संपादनाचे काम मी येण्यापूर्वी झालेले आहे.

मा.सभापती **:** विषय क्रमांक ७ स्थगीत ठेवण्यात येता. पुढील बैठकीत संपूर्ण माहिती घेवून हा प्रस्ताव पुन्हा आणावा.

मा.आयुक्त : स.सदस्यांनी हा जो प्रश्न उपस्थित केला आहे त्यात दोन गोष्टी कायदेशीर दृष्टया ठळकपणे सांगतो की, संम्मतीने कोणी आपल्याला जागा देत असेल ती जागा आपण घेवू शकतो मावेजा निश्चित करावा लागतो आणि त्याला पेमेंट देउ शकतो. संम्मतीने देत नसेल डीपी मध्ये येत असेल तर नोटीस देवून भुसंपादन अधिकाऱ्यांच्या मार्फत नोटीस देतो भुसंपादनाची कारवाई करणे महानगरपालिकेने करणे अपेक्षीत नाही भुसंपादन अधिकारी नोटीस देतात आणि कुणाचा दावा मान्य केलेला आहे कुणाला किती रक्कम

दयायची हे भुसंपादन अधिकारी करतात प्रस्तृत प्रकरणामध्ये जी रक्कमेची मागणी केलेली आहे हि त्यांनी जागा संम्मतीने दिली आहे का? टायटल होते का, या रकमेची अंदाजीत किंमत जी ठरविलेली आहे ती कशावर ठरविलेली आहे याची माहिती पुढील बैठकीत देण्यात येईल.

मा.सभापती : विषय क्रमांक ७ मंजूर करण्यात येतो. स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाची माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेट ते सिल्लेखाना ३०.०० मीटर रूंद विकास योजना बाधीत होत असलेल्या नगर भूमापन क्रमांक १४१३९/पैकी, मिळकतधारक सौ.शोभा भ्र. विजयसिंह राजपुत यांची विकास योजना रस्त्यात बाधीत होत असलेल्या ६२.२५ चौ.मी. क्षेत्राचा मोबदला दर रूपये १८,०००/- प्रति चौ.मी. प्रमाणे रक्कम रूपये ११,२०,५००/- संबंधीतास अदा करण्यास तसेच प्रचलित पध्दती प्रमाणे खरेदी खतासाठी होणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०८ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मंजुरीनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.क्रांतीचौक सर्व्हे नं.५४ येथील महानगरपालिकेने ताब्यात घेतलेली जागा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी महाराष्ट्र शासनाचा उपक्रम राबविणे बाबत सदरील जागेची मागणी केलेली आहे.

क्रांतीचौक उड्डाणपुलाचे काम महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ या कार्यालयातर्फे हाती घेण्यात आलेले असल्यामुळे सदर जागेमध्ये साहित्य ठेवणे, पूर्ण जागेचे संरक्षण करणे, जागेचे सपाटीकरण करणे, निवाऱ्यासाठी तट्टरची आधार घेणे अशा प्रकारे वापर होणार आहे. सदरील जागेचे क्षेत्रफळ ७८५६.८९ चौ.मी. पैकी २००० चौ.मी. जागेची मागणी केल्यानुसार खुल्या जागेचे सिध्द शिघ्र गणकानुसार भाडे रू.३५,०००/- प्रती माह आकारून एक वर्षासाठी बिनव्याजी अनामत रक्कम रू.५,००,०००/- भरणा करून अकरा महिन्यांसाठी भाडेतत्वावर देणेसाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.क्रांतीचौक सर्व्हे नं.५४ येथील महानगरपालिकेने ताब्यात घेतलेली जागा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी महाराष्ट्र शासनाचा उपक्रम राबविणे अंतर्गत क्रांतीचौक उड्डाणपुलाचे काम महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ या कार्यालयातर्फे हाती घेण्यात आलेले असल्यामुळे एकूण क्षेत्रफळ ७८५६.८९ चौ.मी. पैकी २००० चौ.मी. जागा सिध्द शिघ्र गणकानुसार रू.३५,०००/- प्रती माह भाडे आकारून एक वर्षासाठी बिनव्याजी अनामत रक्कम रू.५,००,०००/- भरणा करून अकरा महिन्यांसाठी भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक २४/५/२००९ रोजी शहरात झालेल्या वादळी वाऱ्यामुळे दिल्लीगेट दर्गाह जवळील एक झाड रिक्षावर पडल्यामुळे श्री.शेख मंजुर शेख बाबु, रा.गणेश कॉलनी, औरंगाबाद या रिक्षाचालकाचा या अपघातामध्ये जागीच दुर्दैवी मृत्यु झाला. श्री.शेख मंजुर शेख बाबु हे त्यांचे कुटुंबातील एकमेव कमावते व्यक्ती होते. त्यांची कौटुंबिक परिस्थिती बिकट असल्याने व नैसर्गिक आपत्तीमध्ये त्यांचा अपघाती मृत्यु झाल्यामुळे त्यांचे कुटुंबावर आघात झालेला आहे. त्यांचे मुलीचे लग्न पुढील महिन्यात होणार असून कुटुंबाची सर्व जबाबदारी त्यांचेवर असल्याने कुटुंबाचे पालनपोषणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा दु:खद प्रसंगी संबंधीताचे कुटुंबास सहानुभूतीपुर्वक मदत करणे गरजेचे आहे. तरी मयत रिक्षाचालक श्री.शेख मंजुर शेख बाबु यांचे पत्नी श्रीमती शेख खतीजा यांना रक्कम रू.५०,०००/- (पन्नास हजार रूपये) आर्थिक मदत महानगरपालिकेतर्फे देण्यात यावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती खान मेहरून्नीसा हमीद खान

अनुमोदक : श्री.नारायण कुचे, श्री.रविकांत गवळी, श्री.सतीश कटकटे, श्री.जावेद हसन खान.

**संवाद :**

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. दिल्ली गेट येथे झाड पडल्यामुळे रिक्शाचालकाचे जागेवरच निधन झाले मा.आयुक्तांनी घाटी रूग्णालयात दुरध्वनी करून मार्गदर्शन केले होते. मयत रिक्शाचालकाच्या नातेवाईकास ५० हजारास मंजुरी देत आहे. मा.आयुक्तांचे अभिनंदन करण्यात येते. त्यांनी आजच्या आज चेक देण्याचे मान्य केले आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दिनांक २४/५/२००९ रोजी शहरात झालेल्या वादळी वाऱ्यामुळे दिल्लीगेट दर्गाह जवळील एक झाड रिक्षावर पडल्यामुळे दुर्दैवी मृत्यु पावलेले रिक्षाचालक श्री.शेख मंजुर शेख बाबु, रा.गणेश कॉलनी, औरंगाबाद यांचे कुटुंबास महानगरपालिकेतर्फे रक्कम रू.५०,०००/- (पन्नास हजार रूपये) मयत रिक्षाचालकाची पत्नी श्रीमती शेख खतीजा यांचे नांवे आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा :

श्री.रविकांत गवळी : वॉर्डातील विकासकामांची निवीदा ओपन करतो त्याच्याकरीता जे काम सुरू झालेले आहे त्यासाठी प्रशासनाचे आभार व्यक्त करतो. अंदाजपत्रकीय रक्कम तयार करत असतांना ९९६७९१/- रूपयाचेच अंदाजपत्रक का बनविण्यात येते कारण १० लाखाच्या पुढे गेली की स्थायी समितीपुढे विषय येतो मग स्पिल, अबोव्ह कामाच्या quality संदर्भांत चर्चाहोउन त्यावर अंकुश राहतो म्हणून स्थायी समितीपुढे विषय येत नाही काय? आज आलेल्या १२ निवीदापैकी ७ निवीदा ९९६००० पर्यंत थांबले जातात मग असे का होते. विकास कामांवर अंकुश असायला हवे निवीदा दोन ते अडीच हजारांनी कमी केली जाते.

कार्यकारी अभियंता : अर्थसंकल्पात १० लाखाची तरतुद केली असेल १० लाखाच्या मर्यादेपर्यंत अंदाजपत्रक तयार करून त्या निवीदेस मान्यता देण्यात येते.

श्री.रविकांत गवळी : अंदाजपत्रक तयार करतांना तरतुद लमसम केली जाते त्यावेळेस मेजरमेंट घेतली जाते काय? जाणीवपुर्वक १० लाखाच्या आतील अंदाजपत्रक तयार केले जाते. प्रशासनातर्फे खुलासा अधिकाऱ्यांमार्फत केला गेला पाहिजे स.सदस्यांनी याबाबतीत खुलासा करू नये.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : कुठल्याही सदस्यांनी दुकान मांडण्याकरीता बोलू नये.

मा.सभापती : एकमेकांशी सदस्यांनी बोलू नये.

श्री.रविकांत गवळी : खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ च्या ड मध्ये ५० हजार पेक्षा अधिक परंतु १० लाख किंवा खंड क अन्वये त्यावेळेस विहीत करण्यात येईल त्याहुन अधिक रक्कम यापेक्षा अधिक नसलेला खर्च अशी आयुक्तांनी केलेले प्रत्येक संविदेची माहिती त्यांनी अशी संविदा केल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत स्थायी समितीस माहिती द्यावी. आपण स्थायी समितीस माहिती दिली आहे काय? सदरील नियमाचे पालन का होत नाही. शहर अभियंता यांनी खुलासा करावा. मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ च्या तरतुदी बंधनकारक नाही का?

शहर अभियंता : निवीदेची रक्कम आहे ती अंदापत्रकीय रक्कम आहे ति बजेटमधील जी रक्कम आहे त्याप्रमाणे त्यांनी अंदाजपत्रक केलेले आहे. निवीदा आली आणि ती above आली ती १० लाखाच्यावर आली तर स्थायी समितीसमोर येईल.

मा.सभापती : आपल्याकडे ६० कोटी रोडचे काम चालू आहे २२ आणि ४५ टक्के above ने अधिकाऱ्यांच्या मनाप्रमाणे महानगरपालिका चालत आहे. कुठल्याही सदस्यांनी कुठल्याही अधिकाऱ्यांना पाठीशी घालू नये.

मा.आयुक्त : निविदेची माहिती स्थायी समितीस देता का?

मा.सभापती : १५ दिवसात निविदेची माहिती देणे आवश्यक आहे अदयापपर्यंत माहिती दिली नाही. नियमाचे पालन झाले नाही त्यांच्यावर कारवाई करणार आहे काय?

शहर अभियंता : आत्तापर्यंत माहिती दिलेली नसेल तर यानंतर माहिती दिली जाईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : यापुर्वी ज्यांनी ज्यांनी कामात कुचराई केली होती त्यासर्वांवर कारवाई करण्यात यावी.

शहर अभियंता : यापुढे आपण याची दक्षता घेवू ज्या काही निवीदा येईल त्याबाबतीत १५ दिवसांच्या आत स्थायी समितीस माहिती देण्यात येईल या नियमाचे तंतोतंत पालन केले जाईल.

मा.आयुक्त : खुलासा करावा की निवीदेची रक्कम ९९७००० असेल तर आणि निवीदा १० लाखाच्या वर असेल तर स्थायी समितीसमोर आली पाहिजे.

शहर अभियंता : निवीदेची रक्कम जर १० लाखाच्या जवळ असेल आणि निवीदा above आली तर above धरून जर १० लाखाच्या वर रक्कम जात असेल तर त्याची मंजूरी स्थायी समितीकडेच येईल.

श्री.रविकांत गवळी : जर नियमाचेच पालन करायचे असेलतर अंदाजपत्रकापुर्वी सदरील नगरसेवकांनी स.सदस्यांनी जे कामे करायची असेल त्याच्या पहिले अंदाजपत्रक तयार केले जाते नंतर अंदापत्रकामध्ये तरतुद करण्यात यावी. त्यानंतर हि वस्तुस्थिती लक्षात येईल.

मा.आयुक्त : शहर अभियंता आणि त्यांचे सहकारी आहे त्यांना एक सूचना आहे की हा जो विषय आहे याच्या बाबतीत एखादे अंदाजपत्रक ९९७००० चे झाले आहे हे दाखवून द्या की यापेक्षा वाढत नाही ९९७०००मध्ये बसते.

श्री.कचरू सोनवणे : जळगांव रोडवरील आंबेडकर चौक पिसादेवी रोड येथे मोठा चौक आहे गेल्या कित्येक वर्षापासून त्या ठिकाणी झुनका भाकर केंद्र आहे. झुनका भाकर केंद्राचा मालक गेल्या २० ते २५ वर्षापासून कुठलास व्यवसाय करीत नाही. झुनका भाकर केंद्राच्या आजुबाजूला बऱ्याच लोकांनी रसवंती, चहाची टपरी, केळयांच्या गाडया लावण्यात आलेल्या आहे असे अनेक व्यवहार त्या ठिकाणी चालतात एक कुल्फी विक्रेता त्या ठिकाणी मरण पावलेला आहे. श्री.वाहुळ नावाच्या मुलाचे अपघाताने मृत्यु झालेला आहे. मा.महापौरांनाही पत्र दिलेले आहे. म्हणून त्याठिकाणचे झुणका भाकर केंद्र कामात येत नसेल तर काढुन टाकण्यात यावे व त्या ठिकाणी सुशोभिकरण करण्यात यावे.

श्री.सिताराम सुरे : आंबेडकर चौक व शरद हॉटेल टि पाईंट इथे एक सिग्नल बसविण्यात यावे अशी मागणी सहा महिण्यापुर्वी केलेली होती. व्हिआयपी रोड असल्याने वाहतुकीची वर्दळ त्या ठिकाणी नेहमी असते.

श्री.सतिष कटकटे : मा.दिवाकर रावते यांनी विधानसभेत एक तारांकीत प्रश्न उपस्थित केला होता शासनाने आपल्याला एक पत्र पाठविलेले आहे की झुनका भाकर केंद्र आहे त्या अवस्थेत ठेवावे ते पत्र वाचण्यात यावे.

श्री.कचरू सोनवणे : नविन मोंढा झाला असल्याकारणाने वाहतुक वाढली आहे झुनका भाकर केंद्र कॉर्नवर आलेले आहे त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढत आहे. मा.आयुक्तांनी त्या ठिकाणी भेट देण्यात यावी.

मा.सभापती : शहर अभियंता यांनी झुनका भाकर केंद्रास भेट देण्यात यावी व पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी.

श्रीमती मेहरून्निसा खान : २२८ क्रमांकाचा प्रस्ताव मागील वेळेस आला होता तो स.सदस्यांची दिशाभुल करून प्रस्ताव मंजुर करण्यात आला तो रद्द करण्यात यावा. जुना बाजार येथील ते अतिक्रमण काढण्यात यावे व संबधीतावर गुन्हा नोंदविण्यात यावा. सिटी सर्व्हे नं. ३१४२, ३१४१, ३१३०/१. जुनाबाजार येथील पाच जणांनी सिटी चौक पोलिस ठाण्यात तक्रार केलेली आहे. नगर रचना विभागाने दिशाभुल करून प्रस्ताव मंजूर करण्यात आला तो रद्द करण्यात यावा.

श्री.निमगांवकर प्रल्हाद : वॉर्ड नंबर ८५ मध्ये सर्व्हे नंबर ५२/६ ओपन स्पेस आहे तिथे एक विहीर आहे तिथे आजूबाजुचे नागरीक गणपती विर्सजण करतात त्याठिकाणी अज्ञात व्यक्तींनी महानगरपालिकेच्या जागेवर बोर्ड लावला की हि जागा माझ्या मालकीची आहे म्हणून त्यावर मोबाईल नंबर लिहीलेला आहे सदरील जागेचा कब्जेदार व मालक मी असून

मो.नं.९४२२२०३३२०, ९४२२२०१९७५ असा आहे. तरी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देवून ती जागा आपल्या ताब्यात घ्यावी.

मा.आयुक्त : स.सदस्यांनी हि बाब निर्दशनास आणली आहे मालमत्ता अधिकारी यांनी नोंद घ्यावी संबधीत वार्ड अधिकारी आणि संबधीत अतिक्रमण हटाव पथकातील इमारत निरीक्षक यांनी याची गंभीर दखल घ्यावी महानगरपालिकेच्या मालमत्ता सुरक्षीत राहव्यात आणि इतर कोणी कब्जा करू नये म्हणून यांची जबाबदारी संबधीत वार्ड अधिकारी/कर्मचारी आणि मालमत्ता अधिकारी यांची आहे मा.नगरसेवकांनी हि बाब निर्दशनास आणली तरीही आपल्या काय निर्दशनास आले आणि आपण काय उपाययोजना केलेल्या आहेत.

श्री.सतिष कटकटे : माजी आयुक्त मा.श्री.बंड साहेब यांनी गेल्या चार महिण्यापुर्वी जे अतिक्रमण संदर्भात रोड वाईडिग संदर्भात मोहिम हाती घेतली होती त्याची धुरा कायम ठेवली आहे. आपण जे प्रभाग केले आहे व प्रभागात १३८ कर्मचारी देण्यात आलेले आहे.इमारत निरीक्षक यांची स्पेशल नियुक्त्या केलेल्या नाही. वॉर्ड अधिकारी नियुक्ती करतात. चुकीच्या पध्दतीने इमारत निरीक्षकांची नियुक्ती केलेली आहे त्यामुळे शहरातील अनाधिकृत बांधकाम चालु आहे त्याच्यावर सुरवातीपासून अंकुश ठेवता आलेले नाही. ४ मार्च १९९६ ला महाराष्ट्र शासन नगर विकास तर्फे पत्र आले होते. यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, महानगरपालिका किंवा नगरपालिका संबधीत महापालिका प्रशासकीय विभाग पाडुन त्या क्षेत्रात एका अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी अशा प्रकारे क्षेत्रामध्ये अनाधिकृत बांधकामे किंवा अतिक्रमण होणार नाही यांची जबाबदारी क्षेत्रिय अधिकाऱ्यावर टाकण्यात यावी. मागील अतिक्रमण काढतांना जो पोलिस फोर्स लावण्यात आला होता त्यात त्यांनी १.५० कोटी रूपये थकबाकी दाखविण्यात आलेली आहे त्यामध्ये २५ ते ५० लाख रूपये भरणा केलेली आहे. वॉर्ड ड अंतर्गत १३ बांधकामांना २६०,४७८ अन्वये नोटीस देण्यात आलेल्या आहेत. पोलिस फोर्स देत नाही फोर्स देण्याकरीता पोलिस आयुक्तांना पत्र लिहिले होते. पोलिस आयुक्तांनी पत्रात स्पष्ट लिहिले की, मागील थकबाकी दिल्याशिवाय पोलिस फोर्स देत नाही. परंतु गृह सचिवाकडुन आलेले पत्र यात स्पष्ट दिले आहे की, प्रत्येक क्षेत्रिय अधिकाऱ्याला आवश्यक ते संपूर्ण सहाय्य देणे हे त्या क्षेत्राच्या संबधीत पोलिस अधिकाऱ्याचे राहिल आणि जर पोलिस अधिकाऱ्याकडुन उचित सहकार्य मिळत नसेल तर असे निर्दशनास आले तर त्या पोलिस अधिकाऱ्याविरूध्द तातडीने कारवाई करण्यात यावी. या आदेशाची प्रत सर्व कार्यालयांना दिलेली असून सर्वांना याची जाणीव असतांना पोलिस प्रशासनाकडून पोलिस फोर्स देण्यात येत नाही. १ कोटी रूपये भरणे गरजेचे नाही पोलिस प्रशासनाची ती जबाबदारी आहे. सक्षम अश्या संघटनाच्या अभावी याची अंमलबजावणी होत नाही. सक्षम अश्या प्रशासकीय अधिकारी नसल्यामुळे संघटन होत नाही. त्याकरीता प्रशासकीय अधिकारी नेमण्यात यावा त्यांच्या अंतर्गत इमारत निरीक्षक देण्यात यावा.

श्रीमती खान मेहरून्निसा : मोतिवाला नगर येथे ०६ बंगल्याचे बांधकाम अवैधरित्या चालू आहे. दि.१९.०५.२००९ ला एक पत्र देण्यात आले आहे इमारत निरीक्षकांच्या म्हणण्यानुसार बांधकाम परवानगी आहे परंतु बांधकाम परवानगीची कॉपी मिळत नाही. डिपी रोड लगतसुध्दा आरसीसीचे अवैधरित्या बांधकाम चालू आहे. तक्रार दिल्यानंरत इमारत निरीक्षकांशी तडजोड केली जाते. वॉर्डांना जे अधिकार दिले आहे ते रद्द करून संपूर्ण काम हेड ऑफिसमध्ये व्हायला पाहिजे.

श्री.नारायण कुचे : तत्कालिन आयुक्त श्री.बंड साहेब यांनी तिन ते चार इमारत निरीक्षकांना कोणत्याही बांधकाम विभागाला इमारत निरीक्षक म्हणून पाठवू नये परंतु वार्ड अधिकाऱ्यांनी श्री.विधाते, श्री.पाठक, श्री.संगेवार यांना पुन्हा बांधकामात दिले आहे. शहरात अनेक बांधकाम अनाधिकृतपणे चालू आहे आणि ८३४ हे परवानगीचे आहे. तरी या इमारत निरीक्षकांच्या त्वरीत बदल्या करण्यात याव्या.

मा.सभापती : प्रशासनातर्फे खुलासा करण्यात यावा.

सहा.आयुक्त-१ : ज्या इमारत निरीक्षकांची नावे सांगीतलेली आहे त्यात श्री.संगेवार यांच्या संदर्भात तत्कालिन आयुक्त श्री.शर्मा साहेब यांना इमारत निरीक्षक म्हणून देण्यात येवू नये असे पत्र काढण्यात आलेले आहे व इतरांच्या बाबतीत असे पत्र किंवा आदेश काढण्यात आलेले नाही. वार्ड रचना झालेली आहे त्यावेळी तिन तिन दुय्यम आवेक्षक दिलेले आहे आस्थापना विभागाने विशिष्ट माणुस इमारत निरीक्षक म्हणुन दिलेले नाही. वॉर्ड अधिकारी आपल्या अधिकारात त्यांचा वापर करतात.

श्री.नारायण कुचे : वॉर्ड अधिकाऱ्यांनी त्यांनाच का इमारत निरीक्षक म्हणुन ठेवण्यात आले.

मा.सभापती : वॉर्ड अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकारात नियुक्त्या केलेल्या आहे.

मा.आयुक्त : श्री.संगेवार यांचा जो उल्लेख झालेला आहे त्यांना इमारत निरीक्षक म्हणुन नियुक्ती दिलेली आहे काय?

मा.सभापती : दिलेली नाही.

श्री.नारायण कुचे : श्री.विधाते यांचीही बदली करण्यात यावी. माझ्या वार्डात टॉवरचे काम चालू होते त्यास लोकांनी विरोध केला शहर अभियंता यांना रात्री फोन लावला होता त्यांनी सकाळी श्री.विधाते यांना पाठविले त्यांनी सांगीतले की, नगरसेवकाचा विरोध आहे तुम्ही काम करू नका.

श्रीमती खान मेहरून्निसा : सिटी चौक येथे महानगरपालिकेची जागा आहे येथे एक छोटा रस्ता आहे तो रस्ता बंद करून शेटर उभारलेले आहे यासंदर्भात मी १५.०५.२००९ रोजी पत्र दिले आहे अद्यापपर्यंत कारवाई झालेली नाही.

मा.सभापती : अनाधिकृत बांधकामाबाबत प्रशासनास सुचना देण्यात येते की, पुर्वीप्रमाणे तात्काळ प्रशासनाने प्रशासकीय विभाग चालू करण्यात यावा प्रशासकीय विभागात १२ इमारत निरीक्षक यांचा समावेश करून शहरात होणारे अनाधिकृत बांधकामाबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी आणि नविन प्रशासकीय विभाग तात्काळ सुरू करण्यात यावा.

शहर अभियंता : स.सदस्य श्री.कचरू सोनवणे यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे तर तिथे अनाधिकृत रसवंती असेलतर ती काढण्यात येईल.

मा.आयुक्त : परवानगी घेतली नसेल तर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्रीमती खान मेहरून्निसा : मोतिवाला हॉल ओपनस्पेस येथे अनाधिकृतपणे प्लॉटिंग करून आरसीसी बांधकाम चालू आहे.

मा.सभापती : पुढील बैठकीत माहिती घेवून कार्यवाही करण्यात येईल.

श्री.सतिष कटकटे : मागील स्थायी समितीमध्ये कर्मचारी विमा योजनेमध्ये चौकशी लावण्यात आली होती त्या चौकशी समितीचा अहवाल आला आहे. कामगार आधिकारी दोषी दाखविण्यात आले आहे. संबधीतावर काय कारवाई करणार आहे याचा खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त : सदस्यानी ज्या अहवालाचा उल्लेख केलेला आहे तो आज सकाळी १०.४७ वाजता प्राप्त झालेला आहे. त्यामुळे तो अहवाल उघडुन काळजीपुर्वक वाचणे आणि त्याच्यावर कार्यवाही करणे याकडे मी स्वत:लक्ष देणार आहे. जे दोषारोप लावण्यात आलेले आहे त्या मुद्यांचे बारकाईने अभ्यास करून नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.

मा.सभापती : मा. मुख्यलेखापरिक्षक यांनी जो अहवाल सादर केलेला आहे त्यात येणाऱ्या स्थायी समितीमध्ये प्रशासनाचे काय म्हणने आहे त्यानुसार येणाऱ्या स्थायी समितीमध्ये अहवालावर निर्णय घेण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी : एक करोड रूपये खर्च करून शहरात ४० पाणपोई सुरू केल्या आहे त्याआज बंद अवस्थेत आहे. त्यावर १ लाख रूपये दुरूस्तीसाठी खर्च केलातर पाणपोई सुरू होईल.

मा.सभापती : सकाळ वर्तमानपत्र तसेच इतर वर्तमानपत्रात पाणपोई बाबत वृत्त आले होते पाणपोई चालू करण्याचे काम केव्हा करणार आहे. प्रशासनाने किती पाणपोई चालू व बंद अवस्थेत आहे याची माहिती देण्यात यावी.

मा.आयुक्त : पाणपोई सुरूकरणेसाठी एक लाख नाही दोन लाख रूपये लावण्यात येईल परंतु पाणपोईला पाण्याचा सप्लाय होतो का नाहीतर खर्च करून पाण्याचा सप्लाय होणार नाही. तिन्ही कार्यकारी अभियंता यांनी चालू व बंद पाणपोईची पहाणी करून अहवाल १० दिवसात देण्याचे आदेश देवू.

मा.सभापती : तिन्ही कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या वार्डामध्ये पोणपोई कोणत्या चालू आहे बंद आहे कशा प्रकारे चालू करता येईल याबाबतची सर्व पहाणी करून येणाऱ्या स्थायी समितीमध्ये अहवाल सादर करावा. पाणपोईचा विषय गंभीर स्वरूपाचा आहे पाणपोई तात्काळ सुरू करायचे आहे त्यामुळे तिन्ही कार्यकारी अभियंता यांनी पहाणी करून अहवाल सादर करावा.

श्रीमती मोमिन सफिया : हमालवाडा येथे वर्क ऑर्डर देवून ३ वर्ष झालेली आहे अजूनही रस्त्याचे डांबरीकरण झालेले नाही व अद्यापही काम सुरू केलेले नाही. त्यामुळे नारायण पाथ्रीकर गुत्त्ेदार यांना ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. दुसऱ्या गुत्तेदारांना काम द्यावयास पाहिजे होते तेही देण्यात आले नाही.

अति.शहर अभियंता : पुर्वी सदरील काम माझ्याकडे होते ते आता वॉर्ड फ ला हस्तांतरण झाले आहे. नारायण पाथ्रीकर या गुत्तेदारास अशी आठ ते दहा कामे मिळालेली होती परंतु गुत्तेदाराने आजपर्यंत कुठलेही काम केलेले नाही त्यामुळे त्याच्यावर ब्लॅकलिस्ट व त्याला रद्द करण्याची कारवाई केलेली आहे. तसेच दुसऱ्या गुत्त्ेदाराला आदेश दिले गेलेले आहे.

श्रीमती खान मेहरुन्निसा : माझ्या वॉर्डातील एका ब्रिजचे १७.५० लाखाचे काम आहे २ टक्के भरूनसुध्दा काम करत नाही. दिड वर्ष झालेले आहे गुत्तेदार श्री.मन्नान यांना ब्लॅक लिस्ट करण्यात यावे.

श्री.रविकांत गवळी : आपल्याकडे ब्लॅकलिस्ट गुत्तेदार पुन्हा गुत्ता घेत आहे. त्यावर अंकुश नाही.

मा.सभापती : स.सदस्य श्री.रविकांत गवळी, श्रीमती खान मेहरुन्निसा, श्री.जावेद हसन खान यांनी ज्या-ज्या गुत्तेदारांबद्दल सुचना केली आहे त्यांना ब्लॅकलिस्ट करा आणि पुढील बैठकीत कोणत्या गुत्तेदारांना ब्लॅकलिस्ट केले आहे याबाबत माहिती देण्यात यावी.

श्रीमती मोमिन सफिया : रेल्वेस्टेशन येथे पाण्याचा व्हॉल्व उघडया स्वरूपात आहे त्यामुळे पिण्याचे दुर्गंधीयुक्त घाण पाणी येत आहे.

कार्यकारी अभियंता : रेल्वेस्टेशन येथील मेन व्हॉल्व असावा सदरील भागाची पहाणी करून प्रश्न सोडविण्यात येईल.

मा.सभापती : सदरील भागाची पहाणी करून प्रश्न सोडविण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी : पोलिस प्रशासनाने मागील बाकी १ कोटी रूपयांची दाखविण्यात आली आहे. परंतु गेल्या १५ वर्षापासून पोलिस कॉलनीमध्ये कोटला टाकीतून १५ टँकर आणि एन-७ च्या टाकीमधून १२ टँकर असे एकुण २७ टँकर रोज फ्रि ऑफ चार्ज जातात. २०० रूपये प्रति टँकर याप्रमाणे १५ वर्षाचे करोडो रूपये होतात. या गोष्टीची गांभियाने दखल घेण्यात यावी. जी बाकी आहे ती त्यांच्याकडुन वसुल करण्यात यावी व या कामात ज्या अधिकाऱ्याने दिरगांई केलेली आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती : प्रशासनाकडे याबाबत माहिती आहे का?

श्री.रविकांत गवळी : आज रोजी पाणीपुरवठा होतो किंवा नाही याचाही खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : मागील १५ वर्षापासून पोलिस प्रशासन महानगरपालिकेचे मोफत पाणी घेवून जात आहे. खाजगी व्यक्तींना प्रति टँकर ३०० ते ४०० रूपये प्रमाणे लावण्यात येते. पोलिस प्रशासनाकडे किती पाणी गेले याबाबत रेकॉर्ड आहे काय?

मा.आयुक्त : पोलिस प्रशासनाने पोलिस बंदोबस्त दिला आणि पैशाची मागणी केली हा एक भाग आहे आणि ज्या स्वरूपात पाणी नेत आहे हा दुसरा भाग आहे. हे दोन्ही प्रश्न एकत्रित न करता त्यांची जी मागणी आहे ती बंदोबस्ताची आहे.

मा.सभापती : सहा महिणे पैसे भरले नसल्यामुळे त्यांनी पैशाची मागणी केली आहे गेल्या १५ वर्षापासून पाणी नेत आहे आपण मागणी का नाही करायची.

श्री.रविकांत गवळी : पोलिस प्रशासनास पाणी देणे हे आपले कर्तव्य आहे परंतु त्यांनी तशी मागणी करून चार्ज भरणे गरजेचे आहे.

मा.आयुक्त : स.सदस्यांनी वस्तुस्थितीवरून निवेदन केलेले आहे. १५ वर्षाचा कालावधीचा यात उल्लेख केलेला आहे १५ वर्षापासून टँकर नेले जात आहे. शहर अभियंता यांनी कोआर्डीनेट करून संबधीत कार्यकारी अभियंता यांचेकडून माहिती घेवून १० दिवसाच्या आत वस्तुस्थितीदर्शक अहवाल ठेवावा.

श्री.रविकांत गवळी : टँकर त्यांचे स्वत:चे येतात.

मा.सभापती :७.१२.१९८२ पासून पोलिस प्रशासनाकडुन पैसे वसूल केलेले नाही.

श्रीमती खान मेहरुन्निसा : शहानुरमियॉ दर्गा उस्मानपुरा रोड येथे एका व्यक्तिस ४०X३० जागा देण्यात आली होती. त्यात त्याने ५०X४० काम केले आहे. तिन मजली आर.के.टॉवरचे बेकायदेशिर बांधकाम चालू आहे. त्यावर कारवाई करण्यात यावी व अतिक्रमण काढण्यात यावे.

मा.सभापती : पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद